## नियमित दिवाणी दावा क्र.१८५/२०२० मधील अर्ज नि.क्र.२४ वरील आदेश

**CNRMHSN06002063-2020**

१. प्रस्तुतचा अर्ज वादीने प्रतिवादी क्र.९ यांचे वारस रेकॉर्डवर घेण्याबाबत परवानगी मिळणेबाबत विनंती केली आहे. अर्ज वाचला. उभयपक्षांचा युक्तीवाद ऐकला.

२. वादीच्या अर्जामधील कथन असे की , वादीने प्रतिवादीविरुध्द वाद मिळकतीमधील हिस्सा तुटक वाटप होवुन मिळावा म्हणुन दावा दाखल केलेला आहे . प्रस्तुतचा दावा हा २०२० मधील आहे . सुमारे २ वर्षे कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे कोर्ट कामकाज बंद होते. पक्षकारांना वकीलांशी संपर्क साधुन योग्य ती माहिती देता आली नाही. वादींनी वारस रेकॉर्डवर घेणेस जाणीवपुर्वक विलंब केलेला नसल्याने प्रतिवादी क्र.९ यांचे वारस रेकॉर्डवर घेण्याबाबत विनंती केली आहे.

३. प्रतिवादीने सदर अर्जास म्हणणे दिले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार वादीचा अर्ज मान्य व कबुल नाही. प्रतिवादी नं.२ ह्या दावा दाखल होणेपुर्वी मयत असलेचे दिसते.

४. अर्जामधील कथने वादी यांनी शपथेवर सांगितलेली आहेत. प्रतिवादी क्र.१ यांचे वारस कोव्हीड–१९ या संसर्गजन्य आजाराच्या लॉकडाऊनमुळे वादीस वकीलांशी संपर्क साधुन योग्य ती माहितीची पुर्तता करणे शक्य झाले नाही , असे दिसते. दावा हा तुटक वाटप होवुन मिळण्यासाठी दाखल केलेला आहे . सदरचे कारण हे संयुक्तिक वाटते. प्रतिवादी क्र.९ यांचे वारस रेकॉर्डवर आल्यास प्रतिवादींचे कसलेही नुकसान होणार नाही. वारस रेकॉर्डवर आल्यास दाव्याचा अंतिम गुणदोषावर न्यायनिर्णय देण्यास मदत होणार आहे. नैसर्गिक न्यायतत्वास अनुसरून वादीस वारस रेकॉर्डवर घेण्याची संधी देणे आवश्यक वाटते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

अर्ज मंजुर करण्यात येतो.

**सही/–**

मिरज. **( स्वाती भा. नाईकनवरे–गरड )**

दि. ०७/०१/२०२२ सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, मिरज

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer. | : | S. K. Jadhav, Grade-3 |
| Court. | : | Jt. Civil Judge,Jr.Dn.,Miraj |
| Date. | : | 07.01.2022. |
| Order signed by the Presiding Officer on. | : | 07.01.2022. |
| Order uploaded on. | : | 07.01.2022. |